The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# संत रामदासांचे शिक्षणविषयक विचार

वृषाली सोपानराव उगले
बिटको महाविद्यालय,नाशिकरोड, नाशिक.

महाराष्ट्राला लाभलेल्या संत परंपरेचे वर्णन 'देणे ईश्वराचे' या शब्दात केले जाते ते यथार्थच आहे. महाराष्ट्राचे पंचप्राण म्हणून संत ज्ञानेश्वर,नामदेव, एकनाथ,तुकाराम,रामदास सर्वदूर परिचित आहेत. या संत परंपरेतील संत रामदास हे कालानुक्रमे शेवटचे संत आहेत. समर्थ रामदासांच्या योगदानाचे स्वरूप या संतांच्यापेक्षा वेगळ्या प्रकारचे आहे.समर्थ रामदासांचा प्रपंच,परमार्थ,राजकारण आणि इतर अनेक विचारांसंबंधी उदंड लेखन केले गेले आहे. समर्थ रामदास हे लोकशिक्षक होते ही भूमिकाही सर्व मान्य आहे. पण त्यांचे स्वतःचे शिक्षणविषयक तत्त्वज्ञान होते. त्यांची कार्यात्मक बाजूही मठ- माध्यमातून स्पष्ट केली गेली होती. आधुनिक शिक्षणशास्त्रातील विविध संकल्पनाचे दर्शनही त्यांच्या साहित्यातून होते.संत रामदासांनी शिक्षणशास्त्रातील विविध घटकांची अत्यंत विस्तृतपणे विविधांगी चिकित्सा केलेली आढळते.समर्थ रामदासांनी शिक्षणाचा अर्थ आणि व्याप्ती,शिक्षणाचे ध्येय आणि उद्दिष्टे,शिक्षणाचा आशय,शिक्षक व त्याची गुणवत्ता,अध्यापन पद्धती, अध्ययन संबोध,गुरुशिष्य परस्पर संबंध, नैतिक शिक्षण, शैक्षणिक मानसशास्त्र,शारीरिक आरोग्य, लोकसंख्या शिक्षण ,मूल्यमापन पद्धती इत्यादी बाबींचा विचार त्यांच्या साहित्यातून मांडलेला आहे. परंतु या लेखातून समर्थ रामदासांचा शिक्षण विषयक आशय या घटकाचे विवेचन करण्याचा प्रयत्न करणार आहे.

समर्थ रामदासांच्या साहित्यात 'शिक्षण' हा शब्द कुठेही आढळत नाही.'शिक्षण' हा शब्द सध्याचा काळात ज्या अर्थाने वापरला जातो, त्यासाठी 'ज्ञान' हा शब्द त्यांनी वापरला आहे.रामदासांच्या मते शिक्षणाचा अर्थ केवळ लेखन,वाचन आणि आकडेमोड यांच्याशी निगडीत नाही.रामदासांनी ज्ञान,आत्मज्ञान अद्वैतज्ञान आणि विज्ञान या संकल्पना एकाच अर्थाने वापरल्या आहेत. अशाच आशयाचा विचार मनाच्या श्लोकातही व्यक्त केलेला आहे.

'मना, सन्त आनंत शोधुनी पाहे ॥४६॥

मर्यादीत वेळ आणि काळ यांचा विचार करता जे चिरंतन आहे,त्याचा शोध घेणे अत्यंत अवघड कार्य आहे. चिरंतन आणि अविनाशी वस्तूचा शोध घेणे हे व्यक्तिगत जीवनातील अंतिम ध्येय असू शकते. चिरंतन आणि अविनाशी वस्तूचा शोध घेण्याची प्रक्रिया म्हणजे शिक्षण होय. रामदासांची 'शिक्षण'विषयक संकल्पना पूर्णपणे पारमार्थिक पातळीवर आधारित आहे.रामदासांनी शिक्षणाची अंतिम आणि तत्कालीन उद्दिष्टे निश्चित केलेली आढळतात. रामदासांनी शिक्षणाची उद्दिष्टे सामाजिक कामात रस घेणे आणि त्यातील क्रियाशील सहभाग अधिकाधिक वाढवत जाणे, बलोपासना करणे आणि शारीरिक क्षमता विकसित करणे, सामाजिक जीवनात श्रम-मूल्यांना प्रतिष्ठा देणे ही सांगितली आहेत.

शिक्षणाचे ध्येय आणि उद्दिष्टे यांचा शिक्षणातील अध्ययन अध्यापन घटकांशी अत्यंत निकटचा सहसंबंध आढळून येतो. जोपर्यंत शिक्षणाचे ध्येय आणि उद्दीष्ट यांची निश्चिती होत नाही तोपर्यंत अध्ययन अध्यापनाविषयी घटकांची चर्चा करणे अप्रस्तुत ठरते म्हणूनच शिक्षणाचे ध्येय आणि उद्दिष्टे यासंबंधी चर्चा केल्यानंतर समर्थ रामदासांनी ही डीए आणि उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विविध मार्ग आणि माध्यमे या संबंधी आपली मते व्यक्त केली आहेत आपल्या शिष्यांनी या विविध माध्यमांवर प्रभुत्व संपादन करावे असा समर्थ रामदासांचा आग्रह होता.

**लेखन:-**

समर्थ रामदासांनी लेखनक्रिया व लेखन पद्धती यासंबंधी अतिविस्तृतपणे आपले विचार व्यक्त केले आहेत. समर्थ रामदासांशिवाय अन्य कोणत्याही संतानी लेखनक्रिया व लेखन पद्धती यासंबंधी अधिक रस घेतलेला नाही असे मत समर्थ वाङ्मयाचे प्रसिद्ध संशोधक कै.शं.श्री.देव यांनी व्यक्त केले आहे.

`अक्षर सुंदर वाचणे सुंदर । बोलणे सुंदर चालणे सुंदर।
भक्ति ज्ञान वैराग्य सुंदर । करून दावी ॥
पहिले लिहिणे दुसरे वाचणे । तिसरे सांगणे अर्थांतर ।
सहावे ते गाणे सातवे नाचणे ।

लेखन कौशल्यासंबंधी आपले विचार दोन भागात समर्थांनी व्यक्त केले आहेत. लेखन साहित्य, शाई, लेखणी यासंबंधी तपशिलात जाऊन समर्थांनी वाचकांना श्रोत्यांना जागे केले आहे. गुळगुळीत कागद कसा तयार करावा, गुळगुळीतपणा आणण्यासाठी लाकडी रुळाचा वापर कसा करावा, त्या लाकडी रुळाची वैशिष्टये काय असावी इत्यादीसंबंधी तपशीलवार सूचना दिल्या आहेत. लेखणी तयार करताना कोणती काळजी घ्यावी हेही सांगितले आहे. लेखणीचे लाकूड घट्ट, टणक, बारीक व सरळ असावे असा आग्रह आहे. शाई तयार करण्यासाठी कोणकोणते घटक पदार्थ आवश्यक आहेत यासंबंधीचे विवेचन केले आहे. तांबडी शाई तयार करण्यासाठी गंध,पारा आणि मेण यांचे मिश्रण 'हिंगूळ' वापरावे. पुस्तक सुरक्षित राहण्यासाठी तांबड्या रंगाचे मेण कापड, रेशमी दोरी याचा वापर करावा रामदास लिहितात :

घटय कागद आणावे ।जपोन नेमस्त खळावे ।
लिहिण्याचे सामे असावे । नाना परी ॥
नाना देसीचे बरु आणावे ।घटी बारिक सरळे घ्यावे।
नाना रंगाचे आणावे ।नाना जिनसी ॥
नाना जिनसी टांक तोडणी । नाना प्रकारें रेखाटणी ।
चित्रविचित्र करणी । सिसे लोळ्या ॥
हिंगूळ संग्रहीं असावे । वाळले आळीते पाहून घ्यावे
सोपे भिजवून वाळवावे । संग्रह मसीचे ॥
तगटी इतिश्रया कराव्या । बंदरीं फळया घोटाव्या ॥
नाना चित्री चिताराव्या । उंच चित्रे ॥

नाना गोप नाना बासने । मेन कापडे सिंदूरवर्ण॥
पेटय़ा कुलपे जपणे । पुस्तका कारणे ।।

रामदासांनी लेखन पद्धतीसंबंधी सविस्तर विवेचन केले आहे.

१) चांगल्या हस्ताक्षरातसंबंधी समर्थ रामदास आग्रही आहेत. अक्षर सतत घोटाल्याने आणि अभ्यासपूर्वक प्रयत्न केल्याने अक्षर वळणदार सुंदर आकर्षक येऊ शकते.

२) पुस्तक लिहिताना अक्षरलेखन सर्वत्र समान असावे. म्हणजेच कोणत्याही पानावरील अक्षर हे पुस्तकातील अन्य पानावरील अक्षराप्रमाणेच असावे. जणू काही एकटाकी लेखन झाले आहे असे वाटले पाहिजे.

३) अक्षरे गोल वळणदार सरळ मोकळी असावीत. काळ्या शाईचा लेखनासाठी वापर करावा. मोत्यांच्या माळाचा जणू काही एका रेषेत आहेत असा आभास व्हावा.

४) दोन अक्षरातील दोन शब्दातील अंतर सर्वत्र समान एकसारखे असावे. रफार, काने,मात्रे, वेलांट्या,स्वल्पविराम इत्यादीकडे काळजीपूर्वक लक्ष द्यावे.

५) दोन ओळींतील अंतर सर्वत्र समान असावे. लहान मोठी अक्षरे काढू नये. एका पानावरील शब्दसंख्या ओवीसंख्या यासंबंधी पूर्ण नियोजन असावे.

६) दोन ओळींतील वेलांट्या,रफार इत्यादी एकमेकांत मिसळू देऊ नयेत.

७) लेखनातील चूक कोणालाही काढता येऊ नये इतके ते निर्दोष असावे. शब्दांची अधिक भर घालायची असेल तर त्यामुळे लेखनाचे सौंदर्य बिघडू नये एवढी काळजी घ्यावी.

८) समास आणि अन्य मोकळी जागा याकडेही लक्ष द्यावे अनेक वर्षानंतर कागद खराब झाला तरीही लेखन असलेला भाग सुरक्षित राहिला पाहिजे याची काळजी घ्यावी.

रामदास लिहितात:-

वाटोळे सरळे मोकळे । वोतले मसीचे काळे ।
कुळकुळीत वळी चालिल्या ढाळे । मुक्त माळा जशा ॥
अक्षरमात्र तितुके नीट । नेमस्त पैस काने नीट
आडव्या मात्रा त्याही नीट ।आर्कली वेलांड्या ॥
पहिलें अक्षर जे काढिले ।ग्रंथ संपोते पहात गेले ॥
एका टांकेची लिहिले । ऐसें वाटे ॥
अक्षराचें काळेपण । टांकाचे ठोसरपण ॥
तैसेची वळण वांकाण । सारिखे ची ॥
वोळीस वोळी लागेना । आर्कुली मात्रा भेदीना ॥
खालिले वोळीस स्पर्शेना ।अथवा लंबाक्षर ॥
पान शिशाने रेखाटावें । त्यावरी नेमकेची ल्याहावे ॥
दुरी जवळी न व्हावे । अंतर वोळीचे ॥

कोठें शोधासी अडेना । चुकी पाहता सांपडेना ॥
गरज केली हे घडेना । लेखकापासूनी ॥
भोवते स्थळ सोडोन द्यावे ।मध्येचि चमचमीत लिहावे ॥
कागद सडतां हि झडावे । नलगे चि अक्षर ॥

समर्थ रामदासांच्या साहित्यात लेखनक्रिया संबंधित असे अनेक संदर्भ आढळून येतात.
सुंदर अक्षर लिहावे ।
अक्षर सुंदर लिहो जाणे ।
समर्थ रामदासांनी आदर्श लेखनक्रियासंबंधी खालील प्रमाणे मत व्यक्त केले आहे.
सदट सधन वोळी अक्षरे दाट खेटा ।
सरळ सगट वाची धाकुटा आणि मोठा ।
अचूक चुकत नाही, पुस्तकी शोध नाही ।
बहुत विवरताही वेग काहीच नाही ।

रामदासांनी लेखनक्रिया संबंधित विवेचन केले आहे असे नाही तर लेखनक्रियेमागील मानसशास्त्रीय भूमिकेचाही चिकित्सकपणे विचार केला आहे असे आढळून येते. रामदासांचे वेगळेपण या प्रकारे अनुभवता येते.

जो तरुण आहे ज्याचे वय कमी आहे ज्याने व्यावहारिक जगात नुकतेच पाऊल टाकले आहे, त्यांनी अत्यंत जबाबदारीने लेखन केले पाहिजे. लिखित मजकुरासंबंधी वा लिहिणार असलेल्या मजकुरासंबंधी त्याने साक्षेपी,सावध,जागृत असले पाहिजे. त्याच्या लेखनामुळे वाचकांच्या चित्तवृत्ती बहरून येतील असे लेखन असावे. लेखन पद्धती म्हणजे अक्षरांचा ढंग आणि मजकूर या दोन्हींमुळे वाचकांचे वाचनाकडे आकर्षण वाढावे असे रामदासांचे मत आहे. रामदास असे आग्रहाने सांगतात की, कोणत्याही वयोगटातील वाचक वाचू शकला पाहिजे. तसेच अक्षर,शब्द यांचा आकार,उंची, त्यांचा ढंग हे सर्व नेमस्त,मध्यस्थ असे असावे. लेखनक्रिया व मजकूर यासंबंधी कोणत्याही प्रकारची घाई गडबड गोंधळ करू नये असा वास्तवपूर्ण इशारा समर्थ रामदास देतात,तो योग्यच आहे.
ज्याचे वय आहे नूतन । त्याने लिहावे जपून ।
जनासी पडे मोहन। ऐसे करावे ।
बहु बारिक तरुणपणी । कामा नये म्हातारपणी ।
मध्यस्थ लिहिण्याची करणी । केली पाहिजे ॥
गई लेखनाची गई काळजाची ।गई कागदाची गई पुस्तकाची ।
गई सर्व नये (कामा) करणेची ।

अशाप्रकारे रामदासांनी लेखनक्रिया, लेखन पद्धती यासंबंधी सविस्तर तपशीलवार विवेचन करून आपल्या शिष्यांचे आणि संप्रदायाचे एका मोठ्या शैक्षणिक आशयाकडे लक्ष वेधून घेतले आहे.

**वाचन**

लेखनक्रियेप्रमाणेच वाचनपद्धतीकडे समर्थांनी लक्ष वेधले आहे. वाचन आणि पाठांतर या दोन्हीलाही समान महत्त्व रामदासांनी दिले आहे.वाचन आणि पाठांतर या संबंधी अनेक तपशील नोंदवलेली आहेत

१) प्रसंगीं थोडेचि वाचावे ।चटका लावून सोडावे ।भल्या मनुष्यासी ।

२)अर्थेवीण पाठ कासया करावे ।वेर्थ का मरावे घोकुनिया ॥
घोकुनिया काय वेगी अर्थ पाहे ।अर्थरूप व्हावे होऊनीया ॥
होऊनिया अर्थ सार्थक करावे ।रामदास भावे सांगतासे ॥

३) ग्रंथाचे अन्तर विवरावे

४) प्रबंधाची पाठान्तरे ।उत्तराची संगीत उत्तरे ।
नेमकी बोलत अंतरे ।निववी सकळांची ॥

५) अखंड येकांत सेवावा ।ग्रंथमात्र धांडोळावा ।
प्रचीत येईल तो घ्यावा ।अर्थ मनी ॥

६) चपळ शुद्ध वाचू जाणे ॥

७) पाठ उदंडची असावे ।सर्व काळ ।
।

८) नेटके लिहिता येईना ।वाचितो चुकतो सदा ।
अर्थ तो सांगता येना ।बुध्दि ते रघुनायका ।

९) दिसामाजी काहीतरी लिहीत जावे ।प्रसंगी अखंडी लिहीत जावे ॥

या संदर्भावरून असे दिसते की वाचन आणि पाठांतराची काही लक्षणे यासंबंधी संत रामदास जागरूक आहेत. ती लक्षणे पुढील प्रमाणे नोंदवता येतील.

१) मर्यादित आणि निश्चित उद्दिष्ट असलेले वाचन.
२) वाचनासंबंधी आकलन, समज, सावधानता.
३) योग्य आधार,संदर्भ यांचा वाचनासाठी वापर.
४) जो अर्थ आशय अनुभवसिद्ध आहे त्याचाच स्वीकार करावा.
५) बिनचूक वाचनाचा वेग वाढवावा.
६) पूर्ण ग्रंथ (आशय) वाचल्यानंतरच आपली प्रतिक्रिया विचारपूर्वक नोंदवावी.

७) वाचन आणि पाठांतर यांची सतत उजळणी करावी.

८) विशेष प्रसंगाने निमित्ताने मुद्दाम वाचन व्हावे.

९) वाचन क्रियेचे महत्त्व लक्षात घेऊन वाचन-पद्धती वाचन- आशय असे यासंबंधी बुद्धी देण्याची प्रार्थना रामदासांनी केली आहे.

वाचनाचे महत्व सार्वत्रिक आणि त्रिकालाबाधित असे आहे. वैयक्तिक आयुष्यात यशस्वी होण्यासाठी आपल्या शिक्षण आणि वाचन या क्रियेवर अधिकाधिक प्रभुत्व मिळवले पाहिजे असे रामदासांना वाटते वाचनाकडे दुर्लक्ष झाले तरत्याची फार मोठी किंमत मोजावी लागेल याचे भान रामदासांना होते.

**कथन** :-

यासंदर्भतील समर्थांचे विचार अत्यंत साक्षेपी आहेत. याचा अनुभव त्यांच्या साहित्यातून घेता येतो.आपले बोलणे नेमस्त, विश्वसनीय, अर्थपूर्ण असावे असा रामदासांचा आग्रह होता. रामदासांनी उद्धट, असंस्कृत, मुजोर, कौशल्यहीन, कठोर, संतापी अशा बोलण्याचा तिरस्कार केलेला आहे. अनेक प्रकारे बोलण्यासंबंधी सविस्तर विवेचन केलेले आहे. चांगले कथन यासंबंधी आपले विचार व्यक्त करताना बोलताना कोणत्या गोष्टी टाळाव्यात यासंबंधी श्रोत्यांना सावध करतात.

रामदास लिहितात –

१) सत्य वचनी शुभवचनी । कोमलवचनी येकवचनी ।
निश्चय वचनी सौख्य वचनी । सर्वकाळ ॥

२) विरक्तें विमल ज्ञाने बोलावे ।

३) प्रसंग जाणोन बोलावे ।

४) प्रबंध जाड बोलावे ।
उद्धट बोलणे खोटे । बोला मृदु उत्तरे ॥
प्रत्यये बोलता आले । अचूक न चुके जनी ॥
बोलावें न्याय नीतीने । मर्यादा राखणे ।
बरे सत्य बोला, यथा तथ्य चाला। बरे बोलणे सत्य जीवी धरावे ।

५) विचारेंविण बोलो नये। बोलिला बोल विसरू नये।
बाष्पळपणे बोलो नये। आदर नसता बोलो नये।
तोंडी सीवी असू नये । मागें उणे बोलो नये कोणी येकाचे ॥

६) बोले येक करी येक । तो एक पढतमूर्ख ।

७) वक्ता बहु भाष्य वाचाळ । तैसा श्रोताही तोंडाळ ।
दोन्ही मिळून खळखळ । उदंड करिती ॥

रामदासांनी चांगल्या बोलण्यासंबंधी काही निकष निश्चित केले आहेत. त्यातील काही संक्षिप्तरूपाने पुढील प्रमाणे नोंदवता येतील.

बोलणे हे मंगल, शुभ, यशाची इच्छा निर्माण करणारे, पवित्र वास्तववादी, निश्चित आणि निश्चयी स्वरूपाचे, प्रामाणिकतेची कास धरणारे, सहज सुरेख परिणामकारक प्रभाव निर्माण करणारे, प्रौढ,प्रगल्भ,सखोल विचाराने परिलुप्त, सौम्य, प्रेमळ सुसंगत आणि तर्कशुद्ध इत्यादी गुणांनी युक्त असे असावे.

बोलण्यासंबंधी नकारात्मक बाजू रामदासांनी स्पष्ट केली आहे. अविचारी, विचारशून्य, बाष्कळ बडबड, कंटाळवाणे, दुसऱ्याची टिंगल कुचेष्टा करणारे, शिव्या,निंदानालस्ती यांचा वापर करणारे अशा प्रकारच्या बोलण्याचा अधिकार समर्थांनी केला आहे.

बोलणे आणि त्याचे विविध प्रकारे होणारे परिणाम यासंबंधी रामदासांना वास्तव भान होते. गोड आणि प्रिय अशा बोलण्यामुळे कोणतीही अडचण न येता विविध अवघड कामे सहज पणे यशस्वी होतात असे समर्थ रामदासांचे ठाम मत होते. एखाद्या कामासाठी लोकांचे सहकार्य आवश्यक असेल तर त्या कामाच्या यशस्वितेची गुरुकिल्ली बोलण्यामध्ये आहे; संवाद साधण्यामध्येच आहे हे पक्के ठाऊक होते.

'जगामध्ये जगन्मित्र । जिव्हेपाशी असे सूत्र' असा आशय याच कारणासाठी रामदास वाचकांपुढे सहजपणे उलगडून दाखवतात.एखाद्या विषयासंबंधी माहिती देण्याबाबत असो, की आपल्या संप्रदायाच्या कार्यवाढीसाठी काही कार्यक्रम आखणे असो की, संघटनात्मक पातळीवर एखादी योजना तयार करून त्याची अंमलबजावणी करण्याचे काम असो या सर्व ठिकाणी संभाषण, संवाद, बोलणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे याचा विसर रामदासांना पडलेला नाही.

**संगीत (गायन) :-**

संगीताचे शिक्षणातील योगदान हे अनमोल अशाच प्रकारचे आहे. संगीतातील जाणकार तज्ज्ञ म्हणून रामदासांचे नाव घेतले जाते. कीर्तन, प्रवचन, व्याख्यान यांची उपयुक्तता आणि त्यांचा प्रभाव अधिक वाढवायचा असेल तर काही शैक्षणिक साधनांचा उपयोग करून घेणे अपरिहार्य ठरते. एकसुरी प्रवचन वा व्याख्यान कंटाळवाणी होऊ शकते असा सर्वसामान्य अनुभव आहे. म्हणून रामदासांनी 'रागज्ञान तालज्ञान अभ्यासावे' असे आग्रहपूर्वक सुचविले आहे.याविषयी रामदासांच्या साहित्यात अनेक संदर्भ अभ्यासता येतात.

१)जाणत्यापासी गाणे गावे ।जाणत्यापासी वाजवणे॥
नाना आलाप सिकणे । जाणत्या पासी ॥
२) गर्वगाणे गाऊ नये ।गाता गाता गळो नये॥
३)रम्य रसाळ गायक । निष्ठावंत ॥
४) रागज्ञान ताळज्ञान | नृत्यज्ञान वाद्यज्ञान | अमृतवेल प्रसंग ज्ञान | कैसे ते ऐकावे ||
टाळ मृदुंगहरिकीर्तन | संगीत नृत्य तानमान| नाना कथानुसंधान | तुटोचि नेदावे |
६)साहित्य संगीत रागज्ञान | गीत नृत्य तानमान | नाना वाद्ये सिकविती जन |
संगीतगाणे दे रामा | आलाप गोडी दे रामा ||

रसाळमुद्रा दे रामा | शब्द मनोहर दे रामा ||
दस्तक ताळी दे रामा |नृत्यकला मज दे रामा ||
दास म्हणे रे गुणधामा | उत्तम गुण मज दे रामा ||

अस्वस्थ मनाला शांत, स्थिर, प्रसन्न करण्याची विलक्षण किमया संगीतकलेत आहे. याचे पुरस्कर्ते रामदास होते. म्हणून संगीत महिमा त्यांनी अनेक ठिकाणी वर्णिलेला आहे. वैयक्तिक आणि सामाजिक जीवनातही संगीतामुळे गोडवा, प्रसन्नता येऊ शकते, त्याचबरोबर संतापी वृत्ती निवळू शकते व ईश्वर दर्शनासाठी हे माध्यम प्रभावीपणे सहाय्य्यभूत होते, शिवाय संगीतात रममाण होणे, संगीतात स्वतःला विसरून जाणे म्हणजे ईश्वरदर्शनाचीच अनुभूती घेणे असाही संगीत प्रसाराला पोषक असा विचार रामदासांनी व्यक्त केला आहे.

**निष्कर्ष** :-

रामदासांचा कृती-अधिष्ठित शिक्षणपद्धतीवर ठाम विश्वास होता. त्यांनी अकर्मण्यतेला आपल्या वैयक्तिक आणि सामाजिक जीवनात प्रखर विरोध केलेला आढळून येतो. शरीर आणि मन या दोन्हीलाही तितकेच महत्वाचे स्थान दिले. ज्ञान देण्याची प्रक्रिया ही एकमार्गी असू शकत नाही.ते एक दुहेरी प्रभावी माध्यम आहे. शिक्षकांनी अध्यापन केलेच पाहिजे आणि विद्यार्थ्यांना अध्ययनाशिवाय पर्याय नाही.रामदासांच्यामध्ये ज्ञानाचे दोन प्रकारे वर्गीकरण करता येते. एखाद्या गोष्टीसंबंधीचे ज्ञान व दुसरे म्हणजे एखादी गोष्ट हस्तगत कशी करावी त्यात प्रावीण्य कसे मिळवावे याचे ज्ञान होय. विविध कला आणि विद्या यांचे विवरण समर्थांनी केले असून त्याची सविस्तर सूचीही बनवली आहे. वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, रसायनशास्त्र, यंत्रशास्त्र, भाषाशास्त्र, मानसशास्त्र, संगीतशास्त्र, अंकगणितशास्त्र अशा विविध विषयांचा समावेश केला आहे. पण या सर्व विषयात 'आत्मानुभूती-आत्मदर्शन' याला प्राधान्य दिले आहे.शिक्षणातील विविध बाजूंचा, अंगांचा समग्र विचार रामदासांनी अत्यंत तपशिलात जाऊन केलेला आढळून येतो.

**संदर्भ**:-

१) डॉ.गोगटे वामन,'शिक्षणतज्ञ समर्थ रामदास',गोकुळ मासिक प्रकाशन,पुणे,प्रथमावृत्ती१९९३
२) फाटक न.र.,'श्री समर्थ वाङ्मय आणि कार्य',मौज प्रकाशन,दुसरी आवृत्ती१९७०
३) कावळे,मुदगल,कुलकर्णी,संपा.समर्थ दर्शन,कॉन्टिनेन्टल प्रकाशन,पुणे १९८२
४) सरदार गं.बा.,'रामदास दर्शन',मॉडर्न बुक डेपो,पुणे१९७२